# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कामगार विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रमुख कामगार अधिकारी यांच्या आस्थापनेवरील **'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी'** या संवर्गातील रिक्त असलेली 05 पदे सरळसेवेने भरण्याबाबत मान. महानगरपालिका आयुक्त यांची क्र.एमजीसी/एफ/8094 दि.14.10.2025 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असून, उमेदवारांनी https://portal.mcgm.gov.in/for prospects/Recruitment/Chief Labour Officer या टॅब मधील लिंकवरुन अर्ज सादर करावेत.

उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता/अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत. **अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा वैध ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.** भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र आणि इतर माहिती उमेदवाराच्या ई-मेलवर देण्यात येणार असल्याने भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक वैध राहणे आवश्यक आहे.

सरळसेवा पध्दतीने भरावयाच्या **'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी'** या संवर्गातील पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

पदाचे नाव- **'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी (वर्ग-ब)**

वेतनश्रेणी (सुधारित)- **M-25 (Pay Matrix)** **रु.44900-142400** भरावयाच्या रिक्त पदांची संख्या- **05**

(1) सरळसेवा पध्दतीने **'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी'** या संवर्गाची भरावयाची रिक्त पदे.

तक्ता 'अ'

| अ.क्र | तपशील | अ.जा | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | साशैमाप्र | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | भरावयाची पदे | - | 1 | - | - | - | - | - | 1 | 1 | - ★ | 2 | 5 |

★ साशैमाप्र प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद आदुघ प्रवर्गातून भरण्यात येईल.

तक्ता 'ब'

**सामाजिक व समांतर आरक्षण**

| तपशील | अ.जा | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | साशैमाप्र | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | - | 1 | - | - | - | - | - | 1 | 1 | - | 1 | 4 |
| महिला 30% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| खेळाडू 5% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकूण | - | 1 | - | - | - | - | - | 1 | 1 | - | 2 | 5 |
| अनाथ 1% | - | | | | | | | | | | | |
| दिव्यांग 4% | 1 | | | | | | | | | | | |

दि.३१ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.४ अन्वये सदर संवर्गात दिव्यांगांकरिता किमान १ ते कमाल २५ पदांवर १ पद आरक्षित होत आहे. त्यानुसार दिव्यांग प्रकार अ) अंध/अल्पदृष्टीयांतून पद आरक्षित होईल

दिव्यांग उमेदवारांना खालील नमूद दिव्यांग पदसुनिश्चितीनुसार शारिरीक क्षमता, दिव्यांगत्वाचे प्रकार व कामाचे स्वरुप विचारात घेऊन ते ज्या प्रवर्गात मोडत असतील त्या प्रवर्गातून अर्ज करु शकतील. पात्र झालेल्या दिव्यांग उमेदवारास त्या प्रवर्गातील इतर सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे सर्व अटी व शर्ती लागू राहतील. दिव्यांग प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद त्या प्रवर्गाच्या उपलब्ध रिक्त पदावर भरण्यात येईल. उपरोक्त रिक्त पदांचे परिगणन व दिव्यांग आरक्षणांतर्गत पद भरावयाची कार्यवाही शासन निर्णय क्र.दिव्यांग २०२५/प्र.क्र.६७/आरक्षण-१ दि.३१.०७.२०२५ व परिपत्रक क्र.एमबीसी/०९०५ दि.२४.११.२०२५ अन्वये करण्यात येईल.

**<u>दिव्यांग पदसुनिश्चिती</u>**

| अ. क्र. | पदनाम | शारिरीक क्षमता | दिव्यांगत्वाचा प्रकार | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| 1 | विभागीय कामगार व कल्याण अधिकारी | S-Sitting(बसणे)<br>ST-Standing (उभे रहाणे)<br>W-Walking (चालणे)<br>RW-Reading & Writing (वाचणे व लिहिणे<br>SE-Seeing (पहाणे)<br>H- Hearing (ऐकणे)<br>C-Communication(संवाद साधणे)<br>MF-Manipulation by Fingers (बोटांची हालचाल करणे) | a) B,LV<br>b) D,HH<br>c)OA,BA, OL,BL,OAL, CP,LC,DW, AAV,Mdy<br>d) SLD,MI<br>e)MD Involving (a) to (d) above एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व | महानगरपालिका प्रशासन व कामगार यांच्यामध्ये शांततेचे व सौदार्हाचे संबंध प्रस्थापित करणे, उभयंता मधील तक्रारींचे निवारण करणे. लवाद, न्याय प्रकरणे, समेट प्रकरणे निकाली काढण्याचे कामकाज, कामगार संबंधातील महानगरपालिका धोरण तयार करणे, अनुकंपा/वारसाहक्क प्रकरणांची पडताळणी करणे, निरनिराळ्या संघटनांच्या सभेत चर्चिलेल्या प्रकरणांचा पाठपुरावा, पदोन्नती समिती, तक्रार निवारण समिती, व कामगार/कर्मचा-यांचे वैयक्तिक आणि एकत्रित गा-हाण्यांची दखल घेणे, माहितीचा अधिकारांतर्गत आलेले अर्ज निकाली काढणे. कल्याण केंद्रांचे पर्यवेक्षण करणे, उपहारगृहाबाबतची प्रकरणे, कामगार सुट्टीसंबंधातील धोरण ठरविणे, संपकाळात निष्पक्ष वर्तणूक राखणे, शांतता पूर्वक वाटाघाटी करण्यास मदत करणे. |
| B- Blind अंध, LV- Low Vision अल्पदृष्टी, D- Deaf कर्णबधीर, HH- Hard to Hearing ऐकू येण्यातील दुर्बलता, OA- One Arm एक हात अधू, BA- Both Arm दोन्ही हात अधू, OL- One Leg एक पाय अधू, BL- Both Leg दोन्ही पाय अधू, OAL-One Arm One Leg एक हात एक पाय अधू, CP- Celebral Palsy मेंदूचा पक्षघात, LC- Leprosy Cured कुष्ठरोग, Dw- Dwarfism शारिरीक वाढ खुंटणे, AAV- Acid Attack Victim आम्ल हल्लाग्रस्त, Mdy- Muscular Dystrophy स्नायू विकृती, SLD- Specific Learning Disability विशिष्ट शिक्षण अक्षमता, MI- Mental Illness मानसिक आजार, MD Involving (a) to (d) above एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व | | | | |

परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 सोबतचा शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकाराचा समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गातर्गत OA, OL, OAL, BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुद्धा सुनिश्चित राहतील.

- सरळसेवा भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक व समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया अंशत: किंवा पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
- सामाजिक व अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.
- दिव्यांग उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती संदर्भित करुन त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे.
- दिव्यांग सुनिश्चितीनुसार दिव्यांग पद आरक्षित होत आहे. दिव्यांग उमेदवार त्यांच्या स्वत:चा जात प्रवर्गाकरिता आरक्षित असलेल्या प्रवर्गातून किंवा अराखीव (खुला) प्रवर्गातून अर्ज करु शकतात व ते सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे गुणवत्तेनुसार निवडीस पात्र ठरु शकतात. निवड/ नियुक्तीस पात्र ठरलेल्या दिव्यांग उमेदवारांना सर्वसाधारण उमेदवारांना लागू होणा-या अटी/शर्ती लागू होतील.
- निवडीस पात्र होणा-या दिव्यांग उमेदवारांचे शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40 टक्के दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच दिव्यांग असल्याबाबत महापालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करुन घेण्यासाठी अनुक्रमे परिपत्रक क्र.एमबीसी/3051 दि.22.01.2023 आणि परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/36 दि.21.12.2009 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर दिव्यांग कर्मचा-यांकडे शासन निर्णय क्र.अप्रवि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 व क्र.दिव्यांग-2024/प्र.क्र.86/दि.क.2 दि.27.06.2024 नुसार दिव्यांगत्वाचे Unique Disability Identity Card (UDID) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.
- अराखीव (खुला) उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/ उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

**(2) <u>दिव्यांग उमेदवारांकरिता सूचना.</u>**

**<u>लेखनिक वापरणाऱ्या दिव्यांग व्यक्तींकरिता मार्गदर्शक सूचना</u> :-**

महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभाग, शासन परिपत्रक क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2, दि. 01.08.2025 मधील निर्देशानुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनीक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात येतील. दिव्यांग हक्क अधिनियम, 2016 मधील कलम 2(आर) अन्वये लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या ज्या दिव्यांग व्यक्तींना लिखाण करताना अडचणी/मर्यादा येतात, त्याचप्रमाणे ज्यांची लेखनाची गती कमी आहे अशा दिव्यांग व्यक्तींनी त्यांची इच्छा असल्यास, स्वत:च्या स्तरावर लेखनिकाची व्यवस्था करणे आवश्यक राहील. सदर दिव्यांग व्यक्तीस लिखाण करण्यास शारीरिक मर्यादा आहेत व त्याच्या वतीने परिक्षा देण्यासाठी लेखनीकाची आवश्यकता आहे, अशा आशयाचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी प्रमाणीत केलेल्या विहित नमून्यातील (Appendix-I) प्रमाणपत्र सादर केल्यानंतर लेखनिकाची सुविधा घेण्यास पात्र होईल. तसेच अंधत्व/शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित असलेले/दोन्ही हात नसलेले)/मेंदूचा पक्षाघात या दिव्यांगांच्या प्रकारांमधील लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थींना त्यांची इच्छा असल्यास लेखनीक यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. या वर्गवारीमधील दिव्यांग परिक्षणार्थींना शासकीय रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक

यांनी प्रमाणित केलेले विहित नमून्यातील (Appendix-I) प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. तसेच कलम २ (एस) मधील व्याख्येनुसार दिव्यांगत्व असलेली व्यक्तीने लेखनिक यांची सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी केंद्र शासनाच्या दिनांक १० ऑगस्ट २०२२ च्या कार्यालयीन ज्ञापनातील परिच्छेद ३ (सी) मध्ये नमूद विहित नमुन्यातील (Appendix-II) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

दिव्यांगाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने निवड प्रक्रियेदरम्यान सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच, दिव्यांग प्रमाणपत्राबाबत महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रवि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 व शासन निर्णय क्र.दिव्यांग-2025/प्र.क्र.10/E-office No.1339020/कार्यासन-3 दि.09.10.2025 मधील निदेशानुसार, दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**(3) लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवारांकरीता विशेष सूचना:-**

3.1 दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि / अथवा उत्तरे लिहीण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास लेखनिकाची मदत अनुज्ञेय आहे. यास्तव, लेखनिकाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने उत्तर छायांकित करण्यास / लिहीण्यास मदत करणे अपेक्षित आहे.

3.2 लेखनिकाने प्रश्न वाचून दाखवल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहीत ठिकाणी छायांकित करणे/लिहीणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप / मार्गदर्शन / सूचना करू नये. तसेच परीक्षा यंत्रणेने प्रत्येकी ५ उमेदवारांकरीता (लेखनिकासह) एक समवेक्षक या प्रमाणात समवेक्षकाची नेमणूक करुन उमेदवाराने सांगितलेले उत्तरच लेखनिकाने विहीत ठिकाणी छायांकित / लिहिलेले आहे याची खातरजमा करावी. परीक्षा अधिक पारदर्शक होण्याच्या दृष्टीने परीक्षा यंत्रणेने शक्य असल्यास परीक्षा कक्षामध्ये सीसीटीव्ही / व्हिडीओ रेकॉर्डींग यंत्रणा बसवावी.

3.3 लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवारांशी चर्चा / गप्पा करु नयेत. तसेच इतर लेखनिक / उमेदवार यांच्याशी बोलू नये.

3.4 दिव्यांग उमेदवार व लेखनिक यांना परीक्षांचे सर्व नियम / सूचना जशाच्या तसे लागू असतील.

3.5 उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसचे लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

3.6 वेगवेगळ्या विषयाच्या प्रश्नपत्रिकेसाठी मुख्यत्त्वेकरुन भाषाविषयक प्रश्नपत्रिकेसाठी वेगवेगळे लेखनिक नियुक्त करण्याची संबंधित दिव्यांगत्त्व असलेल्या परिक्षार्थी उमेदवारास परवानगी राहील. तथापि एका विषयाकरिता एकच लेखनिक वापरता येईल.

3.7 परीक्षेचे माध्यम (उदा. सर्वसाधारण / संगणकाद्वारे / ठळक व मोठ्या अक्षरातील प्रती) स्विकारण्याचा पर्याय संबंधित लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्त्व परिक्षार्थी उमेदवारास उपलब्ध करण्यात यावा. जेणेकरुन परीक्षा यंत्रणेस सुलभरित्या तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रश्नपत्रिकेचे रुपांतर मोठ्या व ठळक अक्षरातील प्रतीमध्ये / ई-टेस्ट होईल.

3.8 ज्या परिक्षांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारले जातात, त्या परिक्षांसाठी जर दिव्यांग परिक्षार्थी स्वत: लेखनिक इ. ची व्यवस्था करणार असेल तर परिक्षा यंत्रणेने संबंधित लेखनिकाबाबतची माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सुविधा परिक्षार्थीस उपलब्ध करून द्यावी.

3.9 दिव्यांगत्त्व असलेल्या व्यक्तींना, तसेच लेखनिक वापरण्यास परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांगत्त्व असलेल्या व्यक्तींना देण्यात येणारा सदरचा भरपाई वेळ हा प्रति तास वीस मिनिटे यापेक्षा कमी नसेल. दिव्यांगत्त्व असलेले जे परिक्षार्थी लेखनिक वापरण्याची सुविधा मिळण्यास उपरोक्त विहित केल्यानुसार पात्र असतील, अशा परिक्षार्थींना त्यांनी लेखनिकाची सुविधा घेतलेली नसली तरीसुद्धा तीन तासांच्या परीक्षेसाठी किमान एक तास अधिक याप्रमाणे भरपाई वेळ (Compensatory Time) देण्यात येईल. जर परीक्षेचा वेळ एक तासापेक्षा कमी असल्यास भरपाई वेळ हा त्या

प्रमाणात (pro-rata basis) देण्यात येईल. तथापि सदर वेळ हा पाच मिनिटांपेक्षा कमी नसेल व पाच मिनिटांच्या पटीत सदर वेळ देण्यात येईल.

3.10 परीक्षा यंत्रणेने लेखनिक यांची सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या प्रकरणी संबंधित लेखनिकाची शैक्षणिक पात्रता ही सदर परीक्षेकरीता निश्चित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असणे आवश्यक राहील.

3.11 **शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांकडून किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व दिव्यांग प्रवर्गांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/36 दि.21.12.2009 मधील निर्देशांनुसार व दि. 09.10.2025 रोजीच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या निर्देशांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.**

3.12 सदरची मार्गदर्शक तत्वे केंद्र / महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या सूचनांनुसार / निर्णयानुसार असून, त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

**(4) सामाजिक व समांतर आरक्षण -**

1. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, 2001 आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.
2. जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम -2000 मधील तरतुदी आणि यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी आदेश काढून विहीत केलेल्या नमुन्यामध्ये सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.
3. **महिला आरक्षण** हे शासन निर्णय व महिला व बाल कल्याण विभाग क्रं.82/2001/मेसेआ-2000/प्र.क्र.415/का-2 दि.25 मे 2001 मधील तरतुदीनुसार राहील. तथापि, शासन निर्णय क्र.महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2 दि.04.05.2023 रोजीच्या शासन निदेशांनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता गुणवत्तेच्या आधारावर पात्र ठरणा-या महिला उमेदवारांना नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून सदर शासन निदेशांनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या महिला कर्मचा-यांच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन-क्रिमीलेअर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल.
4. शासन नियमाप्रमाणे **महिलांसाठी 30% इतके** समांतर आरक्षण ठेवण्यात येईल. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.
5. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता इतर सर्व मागास प्रवर्गाच्या सर्व उमेदवारांनी ते/त्या उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. शासन निर्णय क्र.संकीर्ण-2021/प्र.क्र.297/मावक दि.26.07.2022 अन्वये मागास प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांच्या नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्राची

पडताळणी करुन वैध नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्र धारकांचाच नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. परिपत्रक क्र.एमबीसी/9273 दि.10.04.2023 सोबतच्या दि.17.02.2023 रोजीच्या शासन शुद्धीपत्रक क्र.संकिर्ण-2023/प्र.क्र.76/मावक मधील निदेशांन्वये देण्यात आलेल्या सुचनेनुसार त्या त्या वित्तीय वर्षाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

6. अद्ययावत नॉन क्रिमिलेयर/आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्रधिका-याने वितरीत केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

7. शासन निर्णय क्र.समिती-2025/प्र.क्र.194/मावक दिनांक 04.12.2025 व शासन निर्णय क्र.संकीर्ण 2020/प्र.क्र.77 /कार्या-2 दि.29.07.2020 अन्वये प्राप्त शासन निदेशांनुसार नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येईल. परिपत्रक क्र.एमबीसी/5974 दि.08.07.2022 सोबतच्या दि.26.04.2022 रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार मागास प्रवर्गातील उमेदवारांना नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्राची विहित मुदतीत पडताळणी करणे आवश्यक राहील. परिपत्रक क्र.एमबीसी/ 9273 दि.10.04.2023 सोबतच्या दि.17.02.2023 रोजीच्या शासन शुद्धीपत्रकातील निदेशांन्वये देण्यात आलेल्या सुचनेनुसार त्या त्या वित्तीय वर्षाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

8. **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC)** उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी 2024/ प्र.क्र.75/16-क दि.27.02.2024 अन्वये रिक्त पदांच्या 10 टक्के पदे उपलब्ध होत आहेत. तसेच शासन निर्णय क्र.बीसीसी 2024/प्र.क्र.75/आरक्षण-5 दि.28.06.2024 अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाचा अधिनियम 2024 अन्वये जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. परिपत्रक क्र.एमबीसी/4499 दि.03.06.2024 सोबतचे शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.79/आरक्षण-5 दि.19.04.2024 अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) अंतर्गत भरण्यात येणारी पदे जनहित याचिका क्र.30 of 24 व संलग्नित इतर याचिकाअंती अंतिम निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येतील.

9. **आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या (EWS)** उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक.राआधो- 4019/प्र.क्र.31/16-अ, दिनांक 12 फेब्रुवारी 2019 व दिनांक 31 मे, 2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र, जाहिरात अर्ज भरतेवेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राच्या वैधतेची पडताळणी केल्यानंतर वैध प्रमाणपत्र धारकांचाच नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.

10. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाची (EWS) या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

11. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतीचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा/नियम/ आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतूदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

12. सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-2021/प्र.कं.1064/2011/16 ब, दिनांक 12.11.2011 नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून 06 महिन्याच्या आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

13. विजा(अ), भज(ब), भज(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

**(5) 'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी' या पदाची शैक्षणिक अर्हता :-**

1. **पदवी:-** उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला, विज्ञान, वाणिज्य किंवा इतर कोणत्याही शाखेची पदवी धारण केलेली असावी.

**आणि**

2. **(अ)पदव्युत्तर पदवी:-** टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सच्या कर्मचारी व्यवस्थापन व औद्योगिक संबंध यामधील पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.

**किंवा**

(ब) महाराष्ट्र कामगार अध्ययन संस्था, मुंबई मधून कामगार अध्ययन या विषयाची पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.

**किंवा**

(क) महाराष्ट्र शासनाने कारखाना अधिनियम 1948 च्या कलम 49(2) अन्वये कल्याण अधिकारी या पदासाठी मान्यता दिलेली अर्हता धारण केलेली असावी.

**आणि**

3. **अनुभव:-** 500 किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेली संस्था अथवा सार्वजनिक उपयोगिता सेवा संस्था ह्यामधील औद्योगिक संबंध कर्मचारी व्यवस्थापनाचा व कामगारांचे प्रश्न सांभाळायचा किमान 2 वर्षापेक्षा कमी नाही एवढा अनुभव ज्याच्याकडे आहे अशा उमेदवारांमधून.

4. **मराठी भाषेचे ज्ञान**:-उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

5. **संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान:-** उमेदवार "डी.ओ.ई.ए.सी.सी." सोसायटीचे, "सी.सी.सी."किंवा "ओ" स्तर किंवा "ए" स्तर किंवा "बी" स्तर किंवा "सी" स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षणमंडळाचे "एम.एस.सी.आय.टी." किंवा "जी.ई.सी.टी."चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा महाराष्ट्र शासनाने या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल अशी परिक्षा उत्तीर्ण असावा. नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तीने शासनाने विहित केलेली 'एम.एस.सी.आय.टी.'ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून 2 वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**(6) वयोमर्यादा:-**

| वयोमर्यादा | किमान (अराखीव व मागासवर्गीय ) | कमाल | |
|---|---|---|---|
| | | अराखीव | मागासवर्गीय |
| अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास | 18 | 38 | 43 |

**(7) निवडीचे निकष व निवडीची कार्यपद्धती:-**

**अ) निवडीचे निकष**

**'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी'**या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार, अर्ज करावयाच्या अंतिम दिनांकास विहित केलेली अर्हता व अटी /शर्ती धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा संगणकावर घेण्यात येईल. सदर परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या सामाईक गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहित आरक्षणानुसार निवडयादी तयार करण्यात येईल.

'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी' या पदासाठी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप तसेच प्रश्नपत्रिकेचा दर्जा पुढीलप्रमाणे असेल:

| अनु. क्र | विषय | एकूण प्रश्न | एकूण गुण | परिक्षेचे माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप | उत्तीर्ण बाबतचे निकष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | मराठी भाषा | 10 | 20 | मराठी | 60 मिनीट | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेतील एकूण गुणांपैकी किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. उच्चत्तम गुणांनुसार उमेदवारांची निवडसुची तयार करण्यात येईल. |
| 2. | इंग्रजी भाषा | 10 | 20 | इंग्रजी | | | |
| 3. | सामान्य ज्ञान | 10 | 20 | इंग्रजी | | | |
| 4. | बुध्दीमत्ता चाचणी | 10 | 20 | इंग्रजी | | | |
| 5. | विभागीय कामगार व कल्याण अधिकारी पदाच्या अर्हतेशी निगडीत विषय | 60 | 120 | इंग्रजी | | | |
| | एकूण | 100 | 200 | | | | |

★ अर्हतेशी निगडीत विषय -: i) Labour Welfare,ii) Labour Legislation, iii) Industrial Relation & Trade Union in India iv) Personnel Management & Human Resource Development v) Industrial Psychology and organizational behaviour vi) Labour Research, Statistics, Personnel Procedures and Practices

1. मराठी भाषा व व्याकरण परीक्षा मराठी भाषेतून घेतली जाईल. इतर सर्व विषयांची परिक्षा इंग्रजी भाषेतून घेतली जाईल.
2. मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा हा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेच्या (12 वी) दर्जाच्या समान राहील.
3. सामान्य ज्ञान व बुद्धीमत्ता चाचणी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा हा पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील.
4. विभागीय कामगार व कल्याण अधिकारी या पदाच्या अर्हतेशी निगडीत असलेल्या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा हा पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील.
5. मौखिक चाचणी घेण्यात येणार नाही.

**परिक्षेचा अभ्यासक्रम**

| अनु क्र | विषय | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| 1. | मराठी | मराठी - सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ, व्याकरण इत्यादी |
| 2. | इंग्रजी | इंग्रजी- सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण इत्यादी |
| 3. | सामान्य ज्ञान | बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा इतिहास व भूगोल, स्थानिक बाबींची/ वैशिष्ट्यांची माहिती |
| 4. | बुध्दीमत्ता चाचणी | बुध्दीमापन चाचणी |
| 5. | विभागीय कामगार व कल्याण अधिकारी पदाच्या अर्हतेशी निगडीत विषय | i) Labour Welfare<br>ii) Labour Legislation<br>iii) Industrial Relation & Trade Union in India<br>iv) Personnel Management & Human Resource Development |

| | | |
|---|---|---|
| | | v) Industrial Psychology and organizational behaviour<br>vi) Labour Research, Statistics, Personnel Procedures and Practices |

**<u>निवडीच्या निकषानुसार सामाईक गुणवत्ता यादी तयार करताना दोन किंवा अधिक उमेदवारांचे समान गुण असल्यास पुढील निकष लागू राहतील -</u>**

**अ)** विभागीय कामगार व कल्याण अधिकारी या पदाच्या अर्हतेतील अनु क्र.2 येथे नमूद पदव्युत्तर पदवी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांची टक्केवारी (पदव्युत्तर पदवी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांची टक्केवारी अपूर्णांकात आल्यास तीच टक्केवारी ग्राह्य धरली जाईल. पूर्णांकात रुपांतरीत केली जाणार नाही).

**ब)** उपरोक्त **'अ'** प्रमाणे पदव्युत्तर पदवी परीक्षेत समान टक्केवारी असल्यास पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्याचा दिनांक.

**क)** उपरोक्त **'अ' व 'ब'** प्रमाणे समान असल्यास अधिक अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**ड)** उपरोक्त **'अ' 'ब' व 'क'** प्रमाणे समान असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.

**इ)** वरील निकष लागूनही उमेदवारांची गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

सदर निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

**<u>अ) निवडीची कार्यपद्धती</u>**

'विभागीय कामगार व कल्याण अधिकारी' या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार, विहित केलेली अर्हता व अटी/शर्तीच्या पूर्ततेसह भरती प्रक्रिया राबविणा-या बाहय संस्थेमार्फत, सदरहू संवर्गातील 05 रिक्त पदे, सरळसेवा भरती प्रक्रिया राबवून बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेव्दारे भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात येईल.

1. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/for prospects/Recruitment/Chief Labour Officer या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. ऑनलाईन अर्ज करतेवेळी उमेदवारांना काही अडचण निर्माण झाल्यास, मे.आय.बी.पी.एस. (इंस्टीटयुट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या संस्थेमार्फत,उमेदवारांच्या शंकेचे निरसन करण्यासाठी सकाळी 09.00 ते सायंकाळी 06.00 यावेळेत आय.व्ही.एस. (Interactive Voice Support) हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात येईल व ई-मेल सेवा सुविधा पुरविण्यात येईल.
2. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर, भरती प्रक्रिया राबविणारी संस्था, ऑनलाईन परीक्षेकरिता प्रत्येक सामाजिक आरक्षणानुसार प्रवेशपत्र तयार करुन उमेदवारांच्या प्रोफाईलवर उपलब्ध करुन देईल व याबाबत उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या ई-मेलवर व एस.एम.एस.व्दारे अवगत करेल.
3. भरती प्रक्रिया राबविणा-या संस्थेमार्फत निकालपत्र महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर, पात्र उमेदवारांच्या अर्हतेमधील नमुद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रतींची प्रत्यक्ष तपासणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल. पडताळणी दरम्यान, उमेदवाराकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास, त्याची उमेदवारी रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.
4. पात्र उमेदवारांच्या बाबतीत संबधित पोलिस स्टेशनकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल. उमेदवाराची नियुक्ती केल्यानंतर उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्रातील दिनांकापासून ते सदर उमेदवारास सेवेत प्रत्यक्ष नियुक्ती देण्याच्या दिनांकाच्या कालावधीत उमेदवाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा आढळून आल्यास, सदर उमेदवाराचे नियुक्तीपत्र

रद्दबादल करुन, भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

**<u>(8) ऑनलाइन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:-</u>**

1) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

2) ऑनलाईन पध्दतीने करावयाचा अर्ज https://portal.mcgm.gov.in/for prospects/Recruitment/Chief Labour Officer या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

3) उमेदवाराने वर नमूद केलेल्या लिंकवर भेट देऊन सदर जाहिरातीसोबत जोडलेल्या HOW TO APPLY मधील मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन अर्ज सादर करावा.

4) उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर **अर्जाची प्रिंट व परिक्षा शुल्क जमा केल्याची पावती प्रींट काढून स्वत:जवळ ठेवावी.**

5) उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ पुढीलप्रमाणे कॉलसेंटर भ्रमणध्वनी वरून किंवा तक्रार निवारणाकरिता उपलब्ध करून दिलेल्या लिंक वर तक्रार नोंद करू शकता.

**<u>(9)ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा व ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी :-</u>**

**दि.20.02.2026 (००:००:०1) ते दि.12.03.2026(24:००:००)** पर्यंत

**(10) ऑनलाईन परिक्षा शुल्क खालीलप्रमाणे आकारले जाईल.**

- मागासवर्गीय उमेदवारांकरीता **रु.900/-**(रुपये नऊशे फक्त) (वस्तु व सेवाकरासह)
- खुला प्रवर्गातील उमेदवारांकरीता **रु.1000/-** (रुपये एक हजार फक्त) (वस्तु व सेवाकरासह)

  अ) परिक्षा शुल्क भरण्याकरिता online mode उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

  ब) सदर आवेदन शुल्क हे ना-परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**<u>(11) परिक्षा केंद्रांविषयी नियमावली</u> :-**

अ) संबंधित प्रवेश पत्रामध्ये दिलेल्या ठिकाणी ऑनलाईन परिक्षा घेतली जाईल.

ब) परिक्षेसाठी प्रवेश पत्रामध्ये देण्यात आलेले परीक्षा केंद्र/ स्थळ/ तारीख/ सत्र यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती मान्य करता येणार नाही.

क) तथापि, कोणत्याही प्रकारच्या प्रशासकीय व्यवहार्यतेकरीता कोणतेही परिक्षा केंद्र/स्थळ/ तारीख/सत्र यामध्ये बदल करण्याचा अधिकार परीक्षा आयोजक संस्था आपल्याकडे राखून ठेवत आहे.

ड) उमेदवार स्वत:च्या जोखमीवर परिक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहतील. कोणत्याही स्वरुपातील इजा किंवा नुकसानीसाठी परिक्षा आयोजक संस्था जबाबदार राहणार नाही.

इ) परीक्षेसाठी प्रवेश पत्रावर नमूद केलेल्या वेळेनंतर परिक्षा केंद्रावर उपस्थित होणा-या उमेदवारास परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही. कॉल लेटरवर नमूद केलेली रीपोर्टींग वेळ ही परिक्षा सुरु होण्यापुर्वीची आहे. परिक्षेचा कालावधी 60 मिनिटांचा असला तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पुर्ण करण्यासाठी जसे की ओळखपत्र पडताळणी इत्यादी बाबींच्या पुर्ततेसाठी परीक्षा कालावधीच्या सुमारे 1 तास आधी परीक्षा स्थळी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

**<u>(12) ओळख पडताळणी</u> :-**

परिक्षा हॉलमध्ये परिक्षेसाठी उपस्थित होत असताना, मूळ कॉल लेटरसह सध्या वैध असलेले फोटो ओळखपत्र (कॉल लेटरवर नमूद असलेल्या नावाचे) जसे की पॅनकार्ड/पासपोर्ट/ड्रायव्हिंग लायसन्स(कायमस्वरुपी)/मतदार

